**ठळक बातम्या**

- उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि सामाजिक क्षेत्रासह सर्वच क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदींचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून सादर
- शेतकऱ्यांसाठी बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते योजनेची अर्थसंकल्पात घोषणा, पायाभूत सुविधांसाठी विक्रमी गुंतवणूक करण्याचेही नियोजन
- आग्रा इथं छत्रपती शिवाजी महाराज यांचं, संगमेश्वरात संभाजी महाराजां चं, पानिपतमध्ये मराठ्यांच्या शौर्य प्रतिकाचं तसंच साताऱ्यात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचं स्मारक उभारण्याची अर्थसंकल्पात घोषणा.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना लवकरच एकवीसशे रुपये देण्याचं नियोजन सुरू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं स्पष्टीकरण

**आणि**

- जनता, शेतकरी आणि लाडक्या बहिणींची फसवणूक करणारा अर्थसंकल्प असल्याची विरोधकांची टीका

**<><><><><>**

उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि संलग्न क्षेत्रे, सामाजिक तसंच इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदी करणारा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. त्यांचा हा ११ वा अर्थसंकल्प होता. राज्य सरकार

लवकरच नवे औद्योगिक, कामगार, गृहनिर्माण, जलप्रवास, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करणार असल्याची घोषणा यावेळी केली.

नव्या औद्योगिक धोरणातून ५ वर्षात ४० लाख कोटींची गुंतवणूक, ५० लाख रोजगारनिर्मितीचं उद्दिष्ट सरकारनं ठेवले आहे. केंद्र सरकारच्या नवीन कामगार संहितेनुसार नवे कामगार धोरण राज्य सरकार तयार करणार आहे. सर्वांसाठी घर हे उद्दिष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी गृहनिर्माण धोरण लवकरच सरकार जाहीर करणार आहे. प्रत्येकाला ५ किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे.

विमान चालन, रेल्वे, मेट्रो, महामार्ग, जल वाहतूक, बंदर विकास, सिंचन, ऊर्जा, परिवहन आणि दळणवळण यासारख्या पायाभूत सुविधा क्षेत्रात येत्या ५ वर्षात विक्रमी गुंतवणूक करण्याचा सरकारचा विचार असल्याचं अजित पवार यांनी आज जाहीर केलं. नवी मुंबईत अडीचशे एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर उभारलं जाणार आहे. नवी मुंबईत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार, मुंबईत मरोळमध्ये आंतरराष्ट्रीय मत्स्य बाजार, गडचिरोलीतल्या आरमोरीत रेशीम कोष खरेदी विक्री बाजार उभारली जाणार आहे.  याशिवाय मुंबई महानगर क्षेत्राची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० अब्ज डॉलरवरुन २०३० पर्यंत ३०० अब्ज डॉलर आणि २०४७ पर्यंत दीड ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट सरकारनं ठेवलं आहे. अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७ सरकार तयार करणार आहे

एसटी महामंडळाला नवीन बस खरेदीसाठी सरकार अर्थसहाय्य देणार असून ६ हजार डिझेल बसचे CNG, LNG मध्ये रुपांतर करण्याचं काम सुरू आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

बी बियाणे, यंत्रसामुग्री, खते आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते ही नवे योजना अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन पहिल्या टप्प्यात राज्यातल्या ५० हजार शेतकऱ्यांच्या १ लाख एकर क्षेत्राला लाभ देण्याचा निर्णय त्यांनी आज जाहीर केला. कोकणातल्या उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात पाणी वळवण्याचा प्रकल्प हाती घेतला जाणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केली. या अंतर्गत सर्व घरकुलांच्या छतावर सौर उर्जा संच बसविण्यात येणार आहेत. १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या सुमारे दीड कोटी वीज ग्राहकांना छतावरील सौर उर्जा संच खरेदीसाठी सरकार अनुदान देणार आहे. या योजनेमुळे येत्या काही काळात राज्यातील सुमारे ७० टक्के वीज ग्राहकांचे वीजबील टप्प्या टप्प्याने शून्यावर येईल, असं ते म्हणाले. वैद्यकीय महाविद्यालये, आरोग्य संस्थांसह राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर विद्युत यंत्रणा लावण्याची घोषणा त्यांनी आज केली.

येत्या आर्थिक वर्षात लाडकी बहीण योजनेसाठी ३६हजार कोटींचा निधी राखून ठेवला असल्याचं अर्थमंत्री म्हणाले. राज्यातल्या पावणे २ कोटी

असंघटीत कामगार आणि शेतमजुरांसाठी सामाजिक सुरक्षा योजना सरकार राबवणार आहे. अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४२ टक्के, आदिवासी उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४० टक्के एवढी भरीव वाढ केल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्र्यात, छत्रपती संभाजी महाराजांचे संगमेश्वरमध्ये आणि मराठ्यांचे शौर्याचे प्रतीक म्हणून पानिपतमध्ये, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे साताऱ्यातल्या नायगावमध्ये, माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांचे मुंबईत स्मारक उभारण्याची घोषणा अजित पवार यांनी आज केली. रिद्धपूरमधल्या मराठी भाषा विद्यापीठात अभिजात मराठी भाषेच्या संशोधन आणि अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र आणि अनुवाद अकादमी स्थापन केली जाणार आहे. याशिवाय मराठी भाषेच्या संशोधनासाठी पुरस्काराची घोषणा त्यांनी केली २०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण तसंच नमामि गोदावरी अभियानाची घोषणा त्यांनी आज केली.

**<><><><><>**

आगामी आर्थिक वर्षाचा एकूण ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केला. त्यात ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपयांची महसुली जमा आणि ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपयांचा महसुली खर्च अपेक्षित आहे. यात ४५ हजार ८९१ कोटी रुपये तूट अपेक्षित आहे. २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार

२३५ कोटी रुपये आहे. त्यामुळं राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरल्याचं अर्थमंत्री म्हणाले. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे, असं त्यांनी सांगितलं.
चालू आर्थिक वर्षात ३ लाख ६७ हजार कोटींच्या आसपास असलेले कर महसुलाचे उद्दिष्ट पुढच्या वर्षात ३ लाख ८७ हजार कोटींच्या पलीकडे न्यायचं उद्दिष्ट त्यांनी ठेवलं आहे.

**<><><><><>**

व्यक्तीगत वापराच्या सीएनजी आणि एलपीजी वाहनांवरच्या करात १ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केला. याशिवाय ३० लाखापेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी त्यांनी प्रस्तावित केली. बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एस्कॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना तसंच मालवाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर ७ टक्के दराने मोटार वाहन कर आकारण्याचा प्रस्ताव त्यांनी अर्थसंकल्पात मांडला. विविध गोष्टींसाठी लागणारं मुद्रांक शुल्क शंभर रुपयांवरुन ५०० आणि १ हजार रुपये करण्याचा प्रस्तावही त्यांनी सादर केला आहे.

**<><><><><>**

आगामी वर्षाचा अर्थसंकल्प हा लोकाभिमुख आणि राज्याला विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टाकडे घेऊन जाणारा, संतुलित असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना एकवीसशे रुपये देण्याचं आश्वासन पूर्ण करण्यासाठी नियोजन सुरू आहे, असं त्यांनी आज अर्थसंकल्पानंतर वार्ताहर परिषदेत जाहीर केलं.

राज्यात एक कोटी लखपती दीदी तयार करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असंही ते म्हणाले.

या अर्थसंकल्पात कुठल्याही प्रकारे योजनांना कात्री लावलेली नाही. उलट पायाभूत सुविधांच्या विकासांना वेग दिल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. लोकाभिमुख योजना आणि पायाभूत सुविधांचं योग्य संतुलन यात राखल्याचं ते म्हणाले.

राज्याच्या तिजोरीत अधिकाधिक निधी येण्यासाठी केलेल्या तरतुदींची माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

महायुती सरकारने निवडणूक काळात दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता अर्थसंकल्पात केली नाही. या अर्थसंकल्पाद्वारे सरकारने जनतेची फसवणूक केल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. शेतकरी आणि लाडक्या बहिणींची फसवणूक करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.

या अर्थसंकल्पात एसटी, रेल्वेने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले असल्याची टीका माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केली. शेतकरी कर्जमाफी, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा निधी आणखी ३ हजार रुपयांनी वाढवण्याची घोषणा अर्थसंकल्पात नसल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यात आर्थिक बेशिस्तीचा कारभार सुरू असून आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज झाले आहे. महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणणारं हे सरकार राज्याला कर्जबाजारी करून देशोधडीला लावणार, असा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला.

<><><><><>

मुंबईतल्या काही उपनगरांमध्ये बनावट नकाशे जोडून सीआरझेड आणि ना-बांधकाम क्षेत्राच्या तरतुदींचं उल्लंघन करणारी बांधकाम तोडण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानपरिषदेत केली. या प्रकरणात भूमी अभिलेख विभागातील दोघांचं निलंबन केल्याचंही बावनकुळे यांनी आपल्या उत्तरात सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज विधान परिषदेच्या ५ जागांच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. निवडणुकांसाठी १७ मार्च पर्यंत अर्ज दाखल करता येतील, १८ मार्चला अर्जांची छाननी होईल आणि २०

मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटल्यास २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

**<><><><><>**

ऊस तोडणी मशीनचा दर वाढवून मिळावा, बँकेच्या हप्त्यांना मुदतवाढ मिळावी या आणि इतर मागण्यांसाठी ऊस तोडणी मशिन मालकांनी आज पुण्यात साखर आयुक्तांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केलं.

**<><><><><>**

राज्यात उन्हाची तीव्रता वाढू लागली असून उष्माघाताच्या चार रुग्णांची राज्यात नोंद झाली आहे. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित आपत्कालीन उपचारांसाठी विशेष कक्ष उभारण्यात आले आहेत. गेल्या वर्षी ३४७ जणांना उष्माघाताचा त्रास होऊन एकाचा मृत्यू झाला होता.

**<><><><><>**

काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेसच्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. आज पुण्यात पत्रकार परिषदेत त्यांनी याबाबत माहिती दिली. गेल्या 10-12 वर्षांपासून काँग्रेस पक्षाबरोबर काम करत असून पक्ष सोडताना दु:ख होत आहे, असं धंगेकर म्हणाले. नवीन पक्ष प्रवेशाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज संध्याकाळी भेट घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहील. इतरत्र हवामान कोरडं राहील. कोकणात सर्वत्र आणि अकोला जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे.

**//<><><><><>//**